*महाराष्ट्र शासन*
कार्यालय जिल्हा समादेशक होमगार्ड अहमदनगर
दु.क्र. ०२४१-२३२४५१३ ई-मेल -- dchgahmadnagar@yahoo.com

**जा.क्र. : 373 /प्रशा/2024** **दिनांक : 30 /09/2024**

**प्रती,**
**मा. जिल्हा माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय,**
**अहमदनगर.**

**विषय : नविन होमगार्ड सदस्य् नोंदणी अंतिम निकालाची बातमी वृत्त्पत्रातुन विनामुल्य प्रसिद्धीस देणे बाबत..**

**उपरोक्त् विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, अहमदनगर जिल्हा होमगार्डच्या अधिपत्याखालील पथक/उप पथकांमध्ये लक्षसंख्येनुसार अनुशेष भरणे करीता होमगार्ड नोंदणीचे आयोजन दिनांक 28/08/2024 ते 02/09/2024 पर्यंत करण्यांत आले होते. नोंदणी प्रक्रिया पुर्ण झालेली असुन पथक निहाय तात्पुरती अंतिम यादी अहमदनगर जिल्हा होमगार्ड कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवण्यात आली होती. तसेच अहमदनगर तालुका पथकामधील लक्षसंख्येमध्ये अंशतः बदल करुन सुधारीत तात्पुरती अंतिम यादी अहमदनगर जिल्हा होमगार्ड कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवण्यात आली आहे, व https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेत स्थ्‍ळावरसुध्दा उपलब्ध् आहे. खालीलप्रमाणे बातमी जिल्हयातील सर्व वृत्तपत्रामध्ये विनामुल्य् प्रसिध्द् करण्यांत यावी. हि विंनती.**

## प्रेसनोट

**अहमदनगर जिल्हा होमगार्ड मधील विविध पथकांच्या ठिकाणी रिक्त असलेल्या नविन होमगार्ड सदस्य नोंदणी करण्याचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक 19/09/2024 रोजी 522 सदस्यांची पथक निहाय तात्पुरती अंतिम यादी अहमदनगर जिल्हा होमगार्ड कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवण्यात आली होती, तसेच https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेत स्थ्‍ळावरसुध्दा उपलब्ध् करण्यात आली होती. तसेच अहमदनगर तालुका पथकामधील लक्षसंख्येमध्ये अंशतः बदल करुन सुधारीत तात्पुरती अंतिम यादी अहमदनगर जिल्हा होमगार्ड कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवण्यात आली आहे, नोंदणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवांरानी जिल्हा होमगार्ड कार्यालय, सिध्दी बागेजवळ अहमदनगर येथे दिनांक 04/10/2024 रोजी वैदयकिय प्रमाणपत्रासह व नोदणीच्या वेळी दिलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतिसह सकाळी ठिक 10. 00 उपस्थित राहावे. सदर तारखेस जे उमेदवार उपस्थित राहणार नाहीत त्यांचे नांव पात्रता निवड यादीमधुन कमी करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

( प्रशांत खैरे )
जिल्हा समादेशक होमगार्ड तथा,
अपर पोलीस अधिक्षक अहमदनगर